| MHLA160000982018 | प्राप्त दिनांक | : | २१/०२/२०१८. | | |
|---|---|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २१/०२/२०१८. | | |
| | निकाल दिनांक | : | १३/०३/२०२६. | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०८ | ०० | २० |
| | निशाणी क्र. | : | **११** | | |

**भाग 'अ'**

( पॅरा ४४ (i) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | | |
|---|---|---|
| | | **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, देवणी यांचे न्यायालयात**<br>**पिठासीन अधिकारी : श.अ. सुरजुसे**<br>**–:: संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२७/२०१८ ::–** |
| | | **पहिली खबर अहवाल क्र.१६९/२०१८.**<br>**पोलीस ठाणे, देवणी, ता. देवणी, जि. लातूर.** |
| **अभियोग पक्ष** | : | **महाराष्ट्र शासनातर्फे :**<br>पोलीस अधिकारी, पोलीस ठाणे,<br>देवणी ता. देवणी जि. लातूर. |
| **अभियोग पक्षाकरिता** | : | सहाय्यक सरकारी अभियोक्ता, श्री. एस.एम. हाशमी. |
| **आरोपी** | : | **राजकुमार शिवाजी कांबळे,**<br>वय : ३० वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. बोंबळी (बु.), ता. देवणी, जि. लातूर. |
| **आरोपीतर्फे वकिल** | : | श्री. डी.एन. कांबळे. |

**भाग 'ब'**

( पॅरा ४४ (ii) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २७/०९/२०१७. |
| प्रथम खबर अहवाल तारीख | २७/०९/२०१७. |
| दोषारोप पत्राची तारीख | २१/०२/२०१८. |
| दोषारोप निश्चितीची तारीख | ३१/०८/२०२३. |
| सुनावणी प्रारंभ तारीख | ३०/०८/२०२३. |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | निरंक. |
| न्यायनिर्णयाची तारीख | १३/०३/२०२६. |

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:29:34 +0530

| | |
|---|---|
| शिक्षा झाल्यास, शिक्षा सुनावणीची तारीख | -- |

## आरोपी तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनाची तारीख | अपराध दोषारोप | निर्दोष अथवा दोषी | शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ च्या अनुशंगाने सुनावणी दरम्यान न्याय बंदी असण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **राजकुमार शिवाजी कांबळे** | निरंक | ०८/०२/ २०१८ | म.दा.का. कलम ६५(ई) | निर्दोष | निरंक | निरंक |

**टीप –** फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI चे परिच्छेद क्र.४४(iii) प्रमाणे अभियोग पक्षाने सादर केलेले तोंडी आणि लेखी पुरावे हे भाग 'क' मध्ये दाखविलेले असून ते न्यायनिर्णयाच्या शेवटी जोडलेले आहे.

## न्यायनिर्णय

## (दिनांक १३/०३/२०२६ ला पारीत)

महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) च्या गुन्ह्याकरिता खटला आहे.

२. मी उपलब्ध अभिलेख, पुरावा आणि दोन्ही पक्षांचा युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यावरून माझ्या विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेत आणि मी त्यावर माझे निष्कर्ष आणि कारणमीमांसा खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दिनांक २७/०९/२०१७ रोजी, १८.३० वाजता बोंबळी (बु.) येथे आरोपीकडे महाराष्ट्र दारूबंदी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अधिनियमाअंतर्गत प्रतिबंधित दारू बेकायदा विक्री करण्याच्या उद्देशाने मिळाली आणि त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला? | | **नाही.** |
| २. | काय आदेश ? | | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ :-**

**३.** विद्वान साहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. हाशमी व बचाव पक्षाचे विद्वान अधिवक्ता श्री. डी.एन. कांबळे यांनी युक्तिवाद समजावा असे सांगितले.

**४.** अभियोग पक्षाने साक्षीदारांना हजर केलेले नाही आणि त्यांची साक्ष नोंदविलेली नाही. मी आदेश दि.१५/११/२०२५ व ०५/०१/२०२६ प्रमाणे अभियोग पक्षाला सर्व साक्षीदारांना हजर करून साक्ष नोंदविण्याबाबत निर्देश दिले होते. अभियोग पक्षाने त्याचे पालन केलेले नाही आणि साक्षीदारांना हजर करण्यास कसूर केला. अभियोग पक्षाने त्या अनुषंगाने उचित कार्यवाही केलेली नाही. त्याचप्रमाणे आरोपीला जलद गतीने न्याय मिळविण्याचा आणि प्रकरण चालविण्याचा संवैधानिक अधिकार आहे. परंतु अभियोग पक्षाच्या कृतीमुळे सदर प्रकरण विनाकारण प्रलंबित आहे आणि लांबणीवर पडलेले आहे. त्यामुळे आरोपीच्या अधिकाराचे हनन होत आहे. त्यावरून अभियोग पक्षाला प्रकरणामध्ये रस नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ते प्रलंबित ठेवणे अनुचित ठरेल. सबब प्रकरण अभियोग साक्षीदारांच्या साक्षीशिवाय पुढे चालविले. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५८ आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २८१ प्रमाणे सदर प्रकरण बंद करणे उचित असल्याचे आढळून आले.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:29:39 +0530

**५.** मी उपलब्ध अभिलेख आणि पुरावे यांचे काळजीपूर्वक अवलोकन

केले. आरोपींनी मुद्देमालाची जप्ती आणि त्याचा गुन्ह्यातील सहभाग नाकारलेला आहे. अभियोग पक्षाने सदर बाबी सिध्द केलेल्या नाहीत.

६. तसेच नमूद घराची मालकीबाबत कागदोपत्री पुरावा उपलब्ध नाही. अभियोग पक्षाने सदर बाबी सिध्द करण्यास कसूर केलेला आहे. अभियोग पक्षाने तपास अधिकारी आणि स्वतंत्र साक्षीदार यांना तपासलेले नसल्याने जप्ती व नमुना याबाबत ठोस पुरावा उपलब्ध नाही. फक्त रासायनिक परीक्षणाचा अहवाल हा नमूद घटनेतील आरोपीचा सहभाग सिध्द करण्यास पुरेसा नाही.

७. उपरोक्त चर्चेप्रमाणे, मी या निष्कर्षापर्यंत पोहोचलो की, नमूद मुद्देमालाची आरोपीकडून जप्ती सिद्ध झालेली नाही. नमूद त्रुट्या आणि इतर स्थिती हे अभियोग प्रकरणावर संशय उपस्थित करणारे आहेत. आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या तरतुदींचा भंग करून प्रतिबंधित दारू बाळगली हे सिध्द झालेले नाही. मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी दिले.

**<u>मुद्दा क्रमांक २ –</u>**

८. उपरोक्त निष्कर्ष आणि कारणमीमांसा याप्रमाणे आरोपी सबळ पुराव्याच्या अभावी उपरोक्त गुन्ह्यातील निर्दोष होण्यास पात्र आहे. नमूद मुद्देमाल पोलीस ठाणे, देवणी येथे जमा असल्याचे दिसून येते. त्याच्या विल्हेवाटीकरिता आदेश देता येईल. सबब, मी मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरामध्ये खालील आदेश पारित आहे.

## आदेश

१) आरोपीला भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम २७८ (१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) च्या

गुन्ह्यातून निर्दोष करण्यात येते.

२) आरोपीचे पूर्वीचे जामीनपत्र रद्द करण्यात येते.

३) भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४९८ प्रमाणे अपिलाचा कालावधी संपल्यानंतर अपील दाखल न झाल्यास, नियमाप्रमाणे दारूबंदी अधिकाऱ्यामार्फत जप्त देशी दारूचा मुद्देमाल नष्ट करावा.

४) न्यायनिर्णय संगणकावर टंकलिखित करून खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:29:43 +0530

**दिनांक :– १३/०३/२०२६.**
**स्थळ :– देवणी**

**(शरद अ. सुरजुसे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

**परिशिष्ट**
**भाग 'क'**

( पॅरा ४४ (i) फौजदारी मॅन्युअल प्रकरण VI )

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायीक साक्षीदार यांची यादी**

**अ.** अभियोग पक्ष–

| अ.क्र. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायीक कागदपत्रांची निशाणी यादी**

**अ. अभियोग पक्ष –**

| अ.नं. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमालाचा तपशील.**

| अ.क्र. | वस्तुचिन्हाची निशाणी | मुद्देमालाचा तपशील |
|---|---|---|
| १. | निरंक | देशी दारूच्या ८ बाटल्या |

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.03.13 18:29:48 +0530

**दिनांक :– १३/०३/२०२६.**
**स्थळ :– देवणी**

**(शरद अ. सुरजुसे)**
**न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, देवणी**
**जि. लातूर.**

**प्रमाणपत्र**

मी असे प्रमाणित करते की, या PDF न्यायनिर्णय/आदेशामधील मजकूर शब्द न शब्द मूळ न्यायनिर्णय / आदेशाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) लघुलेखकाचे नाव | : | श्री. एम.एन. येणगे (लघुलेखक श्रेणी–२) |
| २) न्यायालयाचे नाव | : | श्री. शरद अ. सुरजुसे,<br>न्यायदंडाधिकारी, प्र. वर्ग, देवणी,<br>जि. लातूर. |